Prabhu Shri Ramchandra Shikshan Prasarak Mandal Tondgaon's

Affiliated with Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Matoshri Shantabai Gote Arts, Commerce & Science College Washim

Career Guidance & Placement Cell

Activities

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम
राष्ट्रीय सेवा योजना नियमीत शिबीर अंतर्गत

भारतीय पोस्ट बँकींग शिबीर अहवाल

दि.22 जुलै २०१९ स्थळ-:महाविद्यालय

मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयात दि. 22 जुलै २०१९ ला राष्ट्रीय सेवा योजना व भारतीय पोस्ट बॅंक वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवशीय बॅंकींग जनजागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय गोटे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून वाशिम पोस्ट ॲफिस शाखा व्यवस्थापक पंकज देशमूख हे होते. कार्यक्रमाची सुरूवात संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. आपल्या मनोगतात पंकज देशमूख यांनी भारतीय पोस्ट ॲफिसचे बॅंकेत रूपांतर झाले असून या माध्यमातून सर्व डिझीटल पद्धतीने व्यवहार केले जाणार असून या बॅंकची सुरूवात 2015 मध्येच झालेली आहे. जो पोस्टमन घरोघरी जाऊन पत्र वाटत असे तो आता घरोघरी जाऊन डिजीटल पेमंट करणार आहे. देशातील बॅंर्किंग क्षेत्रातील सर्वोच्च बॅंक ठरण्याची शक्यता या प्रसंगी व्यक्त केली. त्यांनी कॅंशलेस व्यवहाराचे महत्वही पटवून दिले. शिबीरादरम्यान 50 पेक्षा अधिक विद्याथ्र्यांनी आपले खाते उघडले. अध्यक्षीय मनोगतात संजय गोटे यांनी रासेयोंच्या स्वयसेवकांना कॅंशलेस जनजागृतीत सहभाग घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. बी. आर. तनपुरे यांनी केले. संचलन गणेश मुगवानकर याने केले. तर आभार सहकार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही.बी.चांदजकर यांनी केले. सदर कार्यक्रमास महिला सहकार्यक्रमाधिकारी डॉ. पी.एस. पाथरकर, कु. दिपा निशांत, कु. भाग्यश्री जळजे, विनोद सोळंके यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

दि. २२ जुलै २०१९ रोजी बँकिंग जागृती कार्यशाळेत मार्ग दर्शन करतांना पंकज देशमुख (वाशीम पोस्ट ऑफिस शाखा व्यवस्थापक)

दि. २२ जुलै २०१९ रोजी बँकिंग जागृती कार्यशाळेला उपस्थित पंकज देशमुख (वाशीम पोस्ट ऑफिस शाखा व्यवस्थापक) व इतर मान्यवर

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS COM & SCI COLLEGE WASHIM